भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

CB 743736

TREASURY OFFICE NASIK

22 SEP 2023

STPHC ATO

NOTARY ADV. SUBHASH M. BODKE Nashik District Maharashtra GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

साठेखत करारनामा

०८।१०।२०२३

जोडपत्र - २

दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक :

दस्त नोंदणी करणार आहेत का ? .

नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव .

मिळकतीचे वर्णन

मोबदला रक्कम .

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव

दुसऱ्या पक्षकाराचे नाव

हस्ते असल्यास त्यांचे नाव व पत्ता

· मुद्रांक शुल्क रक्कम

मुद्रांक विक्री नोंद वही अनु.क्रमांक/दिनांक ३९२०३१०

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

दि नाशिक डिस्ट्रीक्ट ॲडव्होकेटस्
मल्टीपरपज् को-ऑप.सोसायटी लि.नाशिक.
प्र.न. एन.एस.के./जी.एन.एल./११२/१९७८ नाशिक कोर्ट
मुद्रांक विक्रेत्याची सही

9 OCT 2023

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

(१)

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to 18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

## साठेखत करारनामा

साठेखत करारनामा आज दिनांक ०९ रोज सोमवार माहे ऑक्टोबर सन २०२३ ते दिवशी नाशिक मुक्कामी

१. **श्री. अमोल शिवाजी गवळी**
वय ३०, धंदा— व्यापार
पॅन— बीएसएसपीजी ८९०७ के
आधार नं. ४६७४ २०४३ ५४११

२. **सौ. सुजाता अमोल गवळी**
वय २६, धंदा— गृहिणी
पॅन— सीएक्सकेपीजी ११२९ बी
आधार नं. ५१६४ ५६६९ ६८७१
दोघे रा. रुम नं. २३४, ब्लॉक नं. ५६
सिंधी कॉलनी, उपनगर नाशिक

**लिहून घेणार**

यांसी

१. **श्री. बाळासाहेब गणेशराव आमटे**
वय ३७, धंदा— नोकरी
पॅन— एएसएसपीए ३१३२ एच
आधार नं. ५५०४ २५९९ २६५८

२. **सौ. सुरेखा बाळासाहेब आमटे**
वय ३७, धंदा— गृहिणी
पॅन— बीडीएक्सपीए ६९०२ क्यु
आधार नं. २५७५ ८९६६ ०२५६
दोघे रा. फ्लॅट नं. एफ—१०१,
युनायटेड संस्कृती को. ऑप. हौसिंग
सोसायटी लि. कपालेश्वर नगर
औरंगाबाद रोड नाशिक

**लिहून देणार**

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

**कारणे साठेखत करारनामा लिहुन देतो की,**

या पुढे या दस्तामध्ये लिहुन घेणार यांचा उल्लेख ''तुम्हीं/लिहुन घेणार/ तुमचे'' आणि लिहुन देणार यांचा उल्लेख ''आम्हीं/आमचे/ लिहन देणार'' असा केलेला असुन या संज्ञा मध्ये या प्रत्येकाचे वंशवारस, कुटूंबीयं, प्रतिनिधी, मुखत्यार,असायनीज या सर्वांचा समावेश आहे.

**१) मिळकतीचे वर्णन—**

अ. तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** येथील स्थावर मिळकत **सर्व्हे नंबर २७७/३/१+२**, पैकी प्लॉट नंबर ३+४+५+६ यासी एकुण क्षेत्र ४९९३.६० चौरस मीटर **या पैकी ३७९० चौरस मीटर** यासी चतु:सिमा येणे प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | — | स. नंबर २७६ |
| पश्चिमेस | — | १२ मीटर रस्ता |
| दक्षिणेस | — | प्लॉट नंबर २ |
| उत्तरेस | — | प्लॉट नंबर ३/४/५/६ पैकी उर्वरित क्षेत्र |

**ब. या दस्ताचा विषय असलेल्या बांधीव मिळकतीचे वर्णन—**

वर कलम १अ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधलेल्या **''युनायटेड संस्कृती को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक''** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटी/ इमारतीतील **इमारत नंबर ३,** मधील **पहिल्या** मजल्यावरील **फ्लॅट नंबर एफ—१०१,** यासी क्षेत्र ३७.३५ चौरस मीटर कारपेट + बाल्कनी क्षेत्र ४.५५ चौरस मीटर, तसेच तळ मजल्यावरील अलॉटेड पार्किंग एस २२ यासी क्षेत्र १२.०० चौरस मीटर यासह यासी चतु:सिमा येणे प्रमाणे

NO[TARY] ADV M. Nash Maha REG. No. Valid up to GOVERNMEN[T]

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | — | फ्लॅट नं. ई—१०४ |
| पश्चिमेस | — | फ्लॅट नं. एफ—१०२ |
| दक्षिणेस | — | मार्जिनल स्पेस |
| उत्तरेस | — | लॅण्डींग व लिफ्ट |

येणे प्रमाणे बांधीव मिळकत, मिळकतीत जाण्या येण्याचे मार्गांचे वापराचे हक्कासह तसेच यातील विज फिटींग, विज मिटर, नळ कनेक्शन, वॉटर मिटर इत्यादीसह तसेच सामाईक वापरासाठी ठेवण्यात आलेल्या जागा जसे जिने, गच्ची, मार्जिनल स्पेस, गार्डन, पंप हाउस, हॉल, इत्यादी सामाईकात वापरण्याचे हक्कासह दरोबस्त मिळकत

२) वर कमल १ब मधील मिळकत मे. जिल्हाधिकारी साहेब नाशिक यांचेकडील हुकूम नंबर मह/कक्ष—३/४/ बि.शे.प्र.क्र./ २६/२०१० दिनांक १८/७/२०११ अन्वये रहिवासी कारणसाठी बिनशेती झालेली असुन मिळकतीचा ले आउट सहा. संचाल नगररचना विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी हुकूम नंबर नगररचना विभाग / अंतिम/ सी १/ ९२/२०१२ दिनांक ६/२/२०१२ अन्वये मंजुर करण्यात आलेला आहे.

३) वर कलम १अ मधील मिळकत श्री. दिपक रामचंद्र बागड व इतर यांचे मालकीची होती. त्यांनी मिळकती संबधाने ले आउट तयार केला व बिनशेती आदेश मिळवला त्यानुसार प्लॉटसचे ७/१२ उतारे अलग तुटक करण्यात आले त्या बाबत गांवी नोंद नंबर ७८२६१ दि. ६/२/२०१२ रोजी करण्यात आली.

४) वर कलम १अ मधील मिळकती पैकी प्लॉट नंबर ३ व ४ ह्या मिळकती श्री. तरुण गोपाळ जगताप यांनी श्री. निखील संजय भातंबरेकर तर्फे जनरल मुखत्यार श्री. संजय भास्करराव भातंबरेकर यांचे पासुन मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक —१ यांचे कार्यालयात दस्त नंबर ६२२३ ला दिनांक ६/७/२०१२ रोजी नोंदलेल्या फरोक्त खरेदीखताने खरेदी घेतली. सदर

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

खरेदीखतानुसर श्री. तरुण गोपाळ जगताप यांचे नांव ७/१२ सदरी नोंद नबर ८३३७४ अन्वये दिनांक ७/७/२०१२ रोजी दाखल करण्यात आले.

५) वर कलम १अ मधील मिळकती पैकी प्लॉट नबर ५ व ६ ह्या मिळकती श्री. तरुण गोपाळ जगताप यांनी सौ. वृषाली विजय भातंबरेकर तर्फे जनरल मुखत्यार श्री. संजय भास्करराव भातंबरेकर यांचे पासुन मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक –१ यांचे कार्यालयात दस्त नंबर ८४५७ ला दिनांक १२/९/२०१२ रोजी नोंदलेल्या फरोक्त खरेदीखताने खरेदी घेतली सदर खरेदीखतानुसर श्री. तरुण गोपाळ जगताप यांचे नांव ७/१२ सदरी नोंद नंबर ८६२३१ अन्वये दिनांक १७/९/२०१२ रोजी दाखल करण्यात आले.

६) वर कलम १अ मधील मिळकती ह्या श्री. तरुण गोपाल जगताप यांनी विकसीत करण्याचे ठरवुन मेसर्स युनायटेड बिल्डर्स तर्फे भागिदार श्री.राजन आसन दर्यानी व श्री. प्रमोद आसन दर्यानी यांचे बरोबर जॉईन्ट व्हेन्चर करारनामा केला सदरचा करारनामा मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक–५ यांचे कार्यालयात अ. नंबर ७९९९ ला दिनांक १४/९/२०१२ रोजी नोंदण्यात आला आहे.

७) मेसर्स युनायटेड बिल्डर्स तर्फे भागिदार श्री.प्रमोद आसन दर्यानी व श्री.तरुण गोपाल जगताप यांनी वर कलम १अ मधील मिळकतीवर एकत्रीतपणे इमारतीचे बांधकाम करण्याचे ठरवुन मिळकतीवर करावयाचे बांधकाम नकाशे नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील बांधकाम परवानगी नंबर एलएनडी/ बीपी/ पंच/ सी–१/ ४६९ / २७०७ दिनांक २६/९/२०१३ अन्वये मंजुर करुन घेवुन मिळकतीवर इमारतींचे बांधकाम पुर्ण केले. त्या बाबतचा भागश: बांधकाम पुर्णत्वाचा दाखला नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी पत्र जा. नंबर नरवि/ २२२४२/ ०६८ दिनांक ३/४/२०१८ हा इमारत नंबर २ विंग सी व डी,

NOTARY
ADV. SUBHASH M. BOOKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14529/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

बिल्डींग नंबर ३ विंग नंबर ई व एफ, तसेच डॉर्मिटरी व क्लब हाउस या करिता करिता मिळालेला आहे.

८) वर कलम १ब मधील आमची स्वकष्टार्जीत स्वसंपादित खरेदी मालकीची असुन सदरची मिळकत आम्हीं मेसर्स युनायटेड बिल्डर्स तर्फे भागिदार श्री.प्रमोद आसन दर्यानी व श्री.तरुण गोपाल जगताप यांचे पासुन मे. दूय्यम निबंधक साहेब नाशिक–५ यांचे कार्यालयात अ. नंबर २१७५ ला दिनांक २३/३/२०१५ रोजीच्या करारनाम्याने विकत घेतली असुन सदर करारनाम्यानुसार मिळकतीची ठरलेली किंमतीची रक्कम आम्ही मेसर्स युनायटेड बिल्डर्स तर्फे भागिदार श्री.प्रमोद आसन दर्यानी व श्री. तरुण गोपाल जगताप यांना अदा केल्यानंतर मिळकतीचा कबजा त्यांनी आम्हांस दिलेला असुन मिळकत आमचे प्रत्यक्ष कबजे उपभोग वहिवाटीत मालकी हक्काने आहे.

९) वर कलम १अ मधील मिळकतीवर बांधलेल्या इमारती संबधाने युनायटेड संस्कृती को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक या नावाने स्थापन करण्यात आलेली आहे. सदरची सोसायटी मे. उपनिंबंधक साहेब सहकारी संस्था नाशिक यांचेकडे अ. नंबर एनएसके / एनएसके/ एचएसजी/ टीसी/ ५८२८/२०१९ ला दिनांक १६/१/२०१९ रोजी नोंदण्यात आलेली आहे. सदर सोसायटीचे आम्हीं संस्थापक सभसद असुन सोसायटीने आमचे नांवे भाग **दाखला नंबर ८४ भाग नंबर ८३१ ते ८४० दिनांक २६/३/२०२३** रोजी अलॉट केलेले आहेत.

१०) सोसायटीचे लाभांत मेसर्स युनायटेड बिल्डर्स तर्फे भागिदार श्री.प्रमोद आसन दर्यानी व श्री.तरुण गोपाल जगताप यांनी कलम १अ मधील मिळकत व त्यावर बांधलेल्या इमारती संबधाने खरेदीखताचा दस्त लिहुन दिला असुन सदर दस्त मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक–३ यांचे कार्यालयात अ. नंबर ४६४९ ला दिनांक २२/६/२०२१ रोजी नोंदण्यात आला आहे. सदर

RY * INDIA

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14525/2019
Valid up to 10/09/2024
GOVERNMENT OF INDIA

खरेदीखता सोबत बांधीव भाग धारकांची यादी जोडण्यात आली आहे सदर यादी मध्ये आमचे नांव कलम १ब मधील मिळकतीचे मालक व कबजेदार म्हणुन **अ. नंबर ७१ ला** दाखल आहे. सबब आमचे लाभांत अलाहिदा हस्तांतरण दस्त/ ट्रान्सफर डिड करण्याची गरज नाही. सदर खरेदीखतानुसार सोसायटीचे नांव ७/१२ सदरी नोंद नंबर २०३४८८ अन्वये दिनांक १/१/२०२२ रोजी दाखल करण्यात आले आहे.

अशा प्रकारे वर कलम १ब मधील मिळकतीची लिहुन देणार यांची स्वतंत्र मालकी असुन मिळकत आमची स्वकष्टार्जीत स्वसंपादित अशी असुन मिळकतीचा आम्हांस आमचे इच्छे प्रमाणे उपभोग घेण्याचा अगर विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे.

११) आम्हीं लिहुन देणार यांना वर कलम १ब मधील मिळकत सोयीची नसल्याने व आम्हांस आमच्या अन्य कायदेशिर गरजा भागविण्यासाठी रकमेची गरज असल्याने आम्हीं वर कलम १ब मधील मिळकत आम्हीं विक्री करण्याचे ठरविले याची माहिति तुम्हांस झालेवरुन तुम्हीं मिळकत खरेदी घेण्याचे ठरविले त्या नुसार तुमचे व आमचे दरम्यान व्यवहाराची बोलणी होवुन सौदा पक्का झाला मिळकत आम्हांस प्राप्त असलेल्या संपुर्ण हक्क व अधिकारांसह तुम्हांस कायमची हस्तांतर करण्याचे ठरले. त्या बाबत तुमचे व आमचे दरम्यान ज्या शर्ती व अटी निश्चीत झाल्या त्या तुम्ही व आम्ही कबुल व मान्य करुन प्रस्तुत साठेखत करारनाम्यानुसार लिहुन ठेवत आहोत.

**१२) आम्हीं ज्या पुर्तता करावयाच्या आहेत त्या अशा की,**

अ. मिळकत ही नोंदणीकृत गृह निर्माण सोसायटीतील असल्यानचे सोसायटीकडे आमचे सभासदत्वाचा राजीनामा देवुन मिळकत तुम्हांस हस्तांतर करण्याकामी परवानगी मिळवुन देणे,

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

ब. सोसायटीकडे जे हस्तांतरण चार्जेस भरावे लागतील ते भरुन देणे

क. मिळकती संबधातील सोसायटी मेन्टेनन्स, नाशिक महानगरपालिका कर, पाणी बिल इत्यादी रक्कम सन २०२३—२०२४ पावेतो भरुन देणे

क. मिळकती संबधाने नोंदीव हस्तांतरण दस्त नोंदण्याकामी कामी जे काही कागदपत्र. लागतील त्या कागदपत्रांची पुर्तता करुन देणे

**१३) वरील पुर्तता आम्ही करावयाच्या आहेत त्या व्यतिरिक्त तुमचे व आमचे दरम्यान ठरलेल्या इतर शर्ती व अटी अशा की,**

१. वर कलम १ ब मधील मिळकतीची तुमचे व आमचे दरम्यान किंमत **रक्कम रुपये २४,००,०००/— अक्षरी रुपये चोवीस लाख फक्त** अशी निश्चीत करण्यात आली असुन सदरची किंमत बाजार भावाने योग्य व रास्त अशी असुन किंमती विषयी वाद अगर तक्रार नाही.

२. मिळकतीचे किंमतीचा भरणा तुम्हीं खालील प्रमाणे दिला आहे व देण्याचा आहे.

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| ५०,०००/— | अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त या कराराचे अखेरचे भरणा कलमांत नमुद केल्या प्रमाणे दिले ते मिळाले. |
| २३,५०,०००/— | अक्षरी रुपये तेवीस लाख पन्नास हजार फक्त तुम्हीं मिळकत खरेदी करिता ज्या वित्तीय संस्थेकडुन कर्ज घेणार आहोत |

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

त्याद्वारे आज पासुन ४५ दिवसांत अदा करण्याचे आहे

---

**२४,००,०००/— अक्षरी रुपये चोवीस लाख फक्त**

---

या प्रमाणे रक्कमेचा भरणा दिला व देण्याचा आहे.

३. उर्वरित रक्कम आम्हांस अदा करण्यासाठी तुम्हीं ज्या वित्तीय संस्था/तुमचे नोकरीचे ठिकाणाहुन कर्ज घेणार आहात त्या कर्जाउ रक्कमेचे परतफेडीचे सुरक्षिततेसाठी वर कलम १ ब मधील मिळकत तारण गहाण देण्यास आमची संमती आहे.

४. कलम १ ब मधील मिळकतीचा प्रत्यक्ष कबजा तुम्हांस तुमचे कडुन उर्वरित रक्कम मिळाल्यानंतर ट्रान्सफर डिड लिहुन नोदंवुन देते वेळेस देण्यात येईल

५. मिळकती बाबतचे ट्रान्सफर डिड आज पासुन ४५ दिवसांत तुम्हीं उर्वरित रक्कम आम्हांस अदा कराल त्यावेळेस लिहुन नोदंवुन देण्यात येईल.

६. वर कलम १ब मधील मिळकत निर्वेध व बिनबोजाची अशी असुन त्यावर कोणत्याही प्रकारचे बोजे जसे दान, गहाण, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मुखत्यार पत्र, अधिकार पत्र, मृत्युपत्र, जप्ती, जामिनकी, कोर्ट वाद, भाडेकरी वाद, खाजगी सावकाराचे, सहकारी, सरकारी, राष्ट्रीयकृत बॅन्केचे कर्जाचा, तारणाचा अगर जामिनीचा बोजा नाही. मिळकतीशी माझे शिवाय अन्य कोणाचाही हक्क, हितसंबध नाही. मिळकत अन्य कोणासही लेखी अगर तोंडी कराराने विक्री करण्याचा करार केलेला नव्हता व नाही. मिळकती बाबत कोणत्याही न्यायालयात वाद चालु नव्हता व नाही.

NOTARY
ADV. SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
RDG. No. 14523/2018
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

मिळकत तबदिल करु नये असा कोणत्याही न्यायालयाचा मनाई हुकूम नाही. मिळकत कोणत्याही कारणास्तव जप्त करण्यात आलेली नाही. अशा प्रकारे संपुर्ण निर्वेध अशीच मिळकत तुम्हांस कायमची हस्तांतर/ वर्ग करण्याचा करार झाला आहे. याउपरही भविष्यात मिळकती बाबत काही एक बोजा अगर वाद दिसुन आल्यास त्याचे निवारण मी माझे पदर खर्चाने करुन देईल त्याची तोषीस तुम्हांस अगर मिळकतीस लागु देणार नाही.

७. मिळकत तुम्हांस कायमची हस्तांतर करण्याचा / खरेदी देण्याचा करार झाला असुन तो रद्द करण्याचा आम्हांस अधिकार नाही.

८. प्रस्तुतचा करार तुम्हीं, आम्हीं व आपले वाली वारसांवर बंधनकारक आहे.

९. प्रस्तुत दस्तऐवजाकामी होणारा खर्च जसे स्टॅम्प, लिहीणावळ, नोंदणावळ इत्यादी संपुर्ण खर्च तुमचे तुम्हीं केलेला व सोसलेला असुन ट्रान्सफर डिड कामी होणारा खर्च तुमचे तुम्हींच करण्याचा आहे.

१४) वर कलम १ब मधील मिळकतीचे किंमती पोटी रकमेचा भरणा पावला तो असा की,

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| २५,०००/– | अक्षरी रुपये अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त चा तुम्हीं लिहुन घेणार यांचे दि नाशिकरोड देवळाली व्यापारी को. ऑप. बॅन्क लि. शाखा उपनगर या बॅन्केतील खात्यावरील चेक नंबर ०२८३३६ दिनांक ७/१०/२०२३ चा आम्हीं लिहुन देणार |

NOTARY
ADV SUBHASH M. BODKE
Nashik District
Maharashtra
REG. No. 14523/2019
Valid up to-18/09/2024
GOVERNMENT OF INDIA

नंबर १ यांचे नांवे दिला त्यानुसार भरणा मिळाला भरणा पावला. तक्रार नाही.

२५,०००/— अक्षरी रुपये अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त चा तुम्हीं लिहुन घेणार यांचे दि नाशिकरोड देवळाली व्यापारी को. ऑप. बॅन्क लि. शाखा उपनगर या बॅन्केतील खात्यावरील चेक नंबर ०२८३३८ दिनांक ७/१०/२०२३ चा आम्हीं लिहुन देणार नंबर २ यांचे नांवे दिला त्यानुसार भरणा मिळाला भरणा पावला. तक्रार नाही.

---

५०,०००/— अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त

---

या प्रमाणे वर कलम १ब मधील मिळकतीचे किंमती पैकी ५०,०००/— अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त या रक्कमेचा भरणा पावला उर्वरित रक्कम आज पासुन ४५ दिवसांत वित्तीय संस्थेकडुन कर्ज घेवुन देण्याची आहे

हा साठेखत करारनामा राजीखुशीने स्वसंतोषाने मजकुर वाचुन व समजावुन घेवुन लिहुन ठेवला असुन याखाली तुम्हीं, आम्हीं आपआपल्या सह्या साक्षीदारासमक्ष केल्या आहेत.

हा साठेखत करारनामा असे
ता.म.

**लिहुन देणार**

१. श्री. बाळासाहेब गणेशराव आमटे





२. सौ. सुरेखा बाळासाहेब आमटे ____________



**लिहुन घेणार**

१. श्री. अमोल शिवाजी गवळी ____________



२. सौ. सुजाता अमोल गवळी ____________

**Parties are Identified by :-**

Adv. L. A. Unhale

**साक्षीदार**

१. ____________ mukhtar shaikh

२. ____________ Rahul patil

**NOTARY**
NOTED & REGISTERED
at Serial No. 3239
Date:- 9 / 10 / 2023
THIS DOCUMENT
Contains 12+4 Pages.

**BEFORE ME**
**SUBHASH M. BODKE**
Advocate & Notary, Govt. of India
8, Vinayak Appt. Harshavardhan
Colony, Makhamalabad Naka,
Panchavati, Nashik - 422 003.